**Department of English**

**2018-19**

| Event Title | - **Career Opportunities after Degree** |
|---|---|
| Organized by- | **- Department of English** |
| Date of organization | **04/02/2019** |
| **Description** | **Department of English organized prof. Karan Patil SVERI College , Pandharpur , a lecture on career opportunities after degree .He emphasized on hardwork, team spirit, inspiration, final goal and approach. He also guided on future policies of Govt. and different opportunities for students in country.** |
| Event photograph | |



**कठोर परिश्रम, संघीय कार्यपद्धती, प्रेरणा, लक्ष्य व दृष्टिकोन ही यशाची पंचसूत्री आहे : प्रा.करण पाटील**

**सांगोला/प्रतिनिधी :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम, संघीय कार्यपध्दती, प्रेरणा, लक्ष्य व दृष्टिकोन या पंचसूत्राचा वापर करावा असे मत पंढरपूर येथील स्वेरी महाविद्यालयाचे एम.बी.ए. विभागप्रमुख प्रा.करण पाटील यांनी व्यक्त केले. सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाच्या सांगोला महाविद्यालयात मराठी व इंग्रजी विभागाच्या वतीने 'पदवीनंतर पुढे काय?' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.करण पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. अर्जुन मासाळ उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.पाटील यांनी पदवीनंतर कोणते शिक्षण घ्यावे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच एमबीए संदर्भात माहिती देताना भविष्यात या क्षेत्रात कोणत्या संधी उपलब्ध होणार आहेत. याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तर प्रभारी प्राचार्य डॉ.अर्जुन मासाळ यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी जिदद व चिकाटी अंगी बाळगावी व योग्य दिशेने वाटचाल करावी असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ.बबन गायकवाड यांनी केले. तर उपस्थितांचे आभार इंग्रजी विभागातील प्रा.कु.रूपाली आगलावे यांनी मानले. यावेळी इंग्रजी विभागातील प्रा.शामराव नवले, प्रा.इमाम शेख, राज्यशास्त्र विभागातील डॉ.जमीर तांबोळी, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Prof. Dr. A.R.Masal
HEAD,
Department of English
Sangola College, Sangola
Dist. Solapur (M.S.)

Principal
Sangola College, Sangola
Tal. Sangola Dist. Solap